बीड । बुधवार
१४.०५.२०२५
वर्षे : ५ अंक : ४३
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# दहावीचा निकाल 94.10 टक्के

## या वर्षीही राज्यात मुलींनीच मारली बाजी



## पहिला नंबर कोकणचाच पाठोपाठ कोल्हापूर

**बीड । प्रतिनिधी**

मंगळवारी, १३ मे रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इ. १० वीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यंदा राज्याचा निकाल ९४.१०% लागला आहे. कोकण विभागाने सर्वाधिक निकाल नोंदवला असून नागपूर विभाग सर्वात मागे आहे. एकूणच, १५,५८,०२० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती, ज्यापैकी ९३.०४% विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

यावर्षीच्या निकालात कोकण विभागाने बाजी मारली आहे. कोकण विभागाचा निकाल ९८.८२% लागला आहे. तर नागपूर विभागाचा निकाल सर्वात कमी म्हणजे ९०.७८% आहे. सर्व विभागीय मंडळातून नियमित विद्यार्थ्यांचा कोकण विभागाचा निकाल (९८.८२ %) सर्वाधिक असून सर्वात कमी निकाल नागपूर विभागाचा (९०.७८%) आहे, असे बोर्डाने सांगितले.

**● निकालातील ठळक मुद्दे**

या परीक्षेसाठी राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून एकूण १५,५८,०२० नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी १५,४६,५७९ विद्यार्थी परीक्षेस ▶▶ उर्वरित पान २ वर

● महाराष्ट्र बोर्डाच्या दहावीचा निकाल जाहीर झाला. कोकण विभागाने सर्वाधिक निकाल नोंदवला असून नागपूर विभाग सर्वात मागे आहे. नियमित विद्यार्थ्यांमध्ये मुलींनी बाजी मारली, त्यांची उत्तीर्णतेची टक्केवारी मुलांपेक्षा जास्त आहे. एकूणच निकालामध्ये नियमित विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक आहे.

**● विभागनिहाय निकालाची टक्केवारी**

कोकण ९९.८२ टक्के, कोल्हापूर : ९६.७८ टक्के
मुंबई : ९५.८४ टक्के , पुणे : ९४.८१ टक्के
नाशिक : ९३.04 टक्के, अमरावती : ९२.९५ टक्के
छत्रपती संभाजीनगर: ९२.८२ टक्के
लातूर: ९२.७७ टक्के, नागपूर : ९0.७८ टक्के

**● एकूण २११ विद्यार्थ्यांना 100 टक्के गुण**

नागपूर ३, संभाजी नगर ४0, मुंबई ८, कोल्हापूर १२, अमरावती ११, नाशिक २, लातूर ११३, कोकण ९

**● राज्यातील एकूण ४९ शाळांचा निकाल 0 टक्के**

पुणे ७ शाळा, नागपूर ८ शाळा , छत्रपती संभाजीनगर ९ शाळा , मुंबई ५ शाळा , कोल्हापूर १ शाळा , अमरावती ४ शाळा , नाशिक ४ शाळा, लातूर १0 शाळा , कोकण १ शाळा

# बीड शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम

## आ. संदीप क्षीरसागर यांनी घेतली नगरपालिकेची आढावा बैठक

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबवण्यासाठी आ. संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि. १३) रोजी नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली.



या बैठकीत शहरातील नालेसफाई, रस्त्यांची स्वच्छता, आणि पाण्याचा निचरा यासंबंधी सविस्तर चर्चा झाली. आ. क्षीरसागर यांनी अधिकाऱ्यांना मान्सूनापूर्वी सर्व नाल्यांची साफसफाई पूर्ण करण्यासाठी नियोजन करण्याचे निर्देश दिले. बीडकरांना पावसाळ्यातील समस्यांना सामोरे जावे लागू नये, यासाठी नियोजनबद्ध काम करणे गरजेचे आहे,असे आ.संदीप क्षीरसागरांनी यावेळी सांगितले. येत्या १० ते १२ दिवसांमध्ये शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता म ोहीम पूर्ण करण्याचे नियोजन करून स्वच्छता मोहीम युध्दपातळीवर राबविण्याचे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी नगरपालिकेला दिले आहेत.

# पहिल्याच अवकाळी पावसामुळे बीड शहरातील नाली आणि नाला तुडुंब भरुन लोकांच्या घरात व हॉटेलमध्ये घुसले पाणी...

## अंधारे मॅडम उघडा डोळ्याने बघा नीट

**▸ भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील**

**बीड । प्रतिनिधी**

सोमवारी दुपारी साडेतीन व चारच्या दरम्यान अचानक वाऱ्यासह वादळासह बीड शहरामध्ये अचानक अवकाळी पाऊस आल्यामुळे बीड शहरातील दळणवळण विस्कळीत झाले व पडलेल्या पावसाचे पाणी येथे असलेल्या नाल्या आणि नाला यामध्ये घाण साचल्यामुळे पाणी जाणार कुठे तर लोकांच्या घरात आणि लोकांच्या हॉटेलमध्ये घुसले तसेच बार्शी रोडवरील जय महाराष्ट्र हॉटेलमध्ये तर या नाला व नालीच्या




घाण पाण्याचा खूप मोठा ढवच साचला होता याचे हे चित्र ही सोमवारी बीड शहरातील नागरिकांनी प्रत्यक्षात पाहिले आहे यामुळे अनेक व्यापाऱ्यांना नागरिकांना या घाण पाण्याचा त्रास सहन करावा लागला हा त्रास आता कुठपर्यंत सहन करायचा अशी चर्चा देखील बीड शहरातील नागरिक तमाम बीड शहरवासीय नागरिक करत आहेत अजून तर पावसाळा ही सुरू झाला नाही हा अवकाळी पाऊस आहे या अवकाळी पावसात जर अशा नाली आणि नाला भरून लोकांच्या घरात पाणी जात असेल तर बीड नगरपालिकेचा आदर्श काय घ्यायचा हा ही प्रश्न बीड ▶▶ उर्वरित पान २ वर



*धारूर: अवकाळीच्या तडाख्याने धारूर तालुक्यातील साखरे यांच्या शेतात पाणी साचल्याने तोंडाशी आलेला घास कालच्या वादळी वाऱ्याने हिरावला हजारो रुपयांचे नुकसान झाले.*

## येऊर हिल्समध्ये 500 रुपये देऊन बलात्काराचा परवाना मिळतो, जितेंद्र आव्हाड यांचा खळबळजनक दावा

**ठाणे । प्रतिनिधीं**

ठाण्यातील येऊर हिल्सम धील दोन बंगल्यांमध्ये दोन बलात्कार झाले आहेत. दोन्ही बंगले बेकायदेशीररित्या बांधण्यात आले आहेत. या परिसरात अनेक गैरप्रकार घडत असल्याचे जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे.

येऊर हिल्सच्या मुख्य प्रवेशद्वारावर ५०० रुपये देऊन बलात्काराचा परवाना मिळतो



असा खळबळजनक दावा आव्हाड यांनी केला आहे. त्यांनी ट्वीट करत बेकायदेशीर बांधकामांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.

ठाण्यातील येऊर हिल्स संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा एक भाग आहे. येथील मुख्य प्रवेशद्वारावर ५०० रुपयांत बतात्कार करण्याची परवानगी दिली जात आहे. वर्तक नगर पोलीस स्थानकामध्ये २४ तासांत दोन गंभीर प्रकरणांवर एफआयआर दाखल झाल्यानंतर येऊर परिसरावर सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे.' हेअर ▶▶ उर्वरित पान २ वर

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे निमंत्रण

**▸ कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे दिले आश्वासन**

**मुंबई । प्रतिनिधी**

गोवा येथे होणाऱ्या 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'साठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांना निमंत्रण देण्यात आले. या निमंत्रणप्रसंगी दोन्ही मान्यवरांनी महोत्सवाला उपस्थित ▶▶ उर्वरित पान २ वर



# बीड तहसीलदार चंद्रकांत शेळकेंचा कर्तव्यदक्षपणा



**▸ रात्री वादळ,वारा, पावसाने पडझड ; सकाळी नुकसानीची पाहणी ; जाग्यावरच दिल्या तलाठ्यांना पंचनाम्याच्या सूचना**

**▸ प्रभाग क्रमांक २४ मध्ये झालेल्या नुकसानीची तातडीने मदत करावी ;साहस आदोडे यांची तहसीलदारांकडे मागणी**

**बीड । प्रतिनिधी**

रात्री बीड शहरासह जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वादळ वाऱ्यासह पावसाने धुम ाकूळ घातला. यामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. बीड नगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या प्रभाग क्रमांक २४ मध्ये विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात झाडे, लाईटचे पोल कोसळले, त्याच बरोबर अनेक गोरगरीबांचे पत्र्यांचे घरे, त्यावरील पत्रे वाऱ्याने उडून गेली. संसार उघड्यावर पडला. एवढेच नव्हे तर झाडे व लाईट पोल घरावर पडून मोठ्या प्रमाणात घराचे नुकसान झाले. घरामध्ये पाणी शिरून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.





सदरील ही माहिती बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना सांगितल्यानंतर सकाळीच कर्तव्यावर जाण्या अगोदर थेट नुकसानग्रस्तांच्या भेटीला पोहचले. विविध ठिकाणी पाहणी करून तलाठ्यांना जाग्यावरच पंचनामा करण्याच्या सूचना दिल्या. नुकसानग्रस्तांनी बीड तहसीलदार यांचे आभार मानून एवढ्या तातडीने भेट देण्यासाठी व पाहणी करण्यासाठी तहसीलदार आल्यामुळे येथील नागरीकांनी आभार मानले. व यावेळी साहस आदोडे यांनी तहसीलदार यांना नुकसानग्रस्तांना तातडीने शासनाकडून मदत मिळावी यासाठी मागणी केली.

जिल्ह्यामध्ये काल सायंकाळपासून वादळ वारा व पाऊस मोठ्या प्रमाणात झाला. यामध्ये जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात शेतकर्यांचे नुकसानी बरोबर शहरातील लोकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले . बीड शहरात प्रभाग क्रमांक २४ मध्ये ▶▶ उर्वरित पान २ वर

## खदानीत सौर ऊर्जा प्रकल्प अभियंता बुडाला

**केज । प्रतिनिधी**

एका खडी क्रेशरवर सौर ऊर्जा पॅनल बसविण्यासाठी कामावर असलेला खाजगी अभियंता खदानीत बुडाला. आपल्या चार साथिदारांसह पोहायला गेला असताना मंगळवारी (दि.१३) दुपारी २ च्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडली. अग्निशमन दल आणि खाजगी पानबुड्याची मदत घेऊन त्याचा शोध सुरू आहे. सचिन केरबा गोरे वय २५ वर्ष, (रा.अवंती नगर, बार्शी रोड लातूर ) असे या अभियंत्याचे नाव आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, केज येथील योगिता इको सँड अँड क्रशर येथे एका ▶▶ उर्वरित पान २ वर



# स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज

१४ मे १६५७ रोजी किल्ले पुरंदरावर महाराणी सईबाई यांच्या पोटी शंभूराजांचा जन्म झाला. शिवरायांसारख्या तेजस्वी सिंहाच्या पोटी तेजस्वी छावा जन्माला आला. आणि सुरू झाला प्रवास एका संकटमय आणि संघर्षमय जीवनाचा. जन्मतःच सईबाईं मातोश्रींच्या आजारपणामुळे आईच्या दुधाला पारखे झाले आणि अवघ्या दोन वर्षांचे असताना मातृछत्र हरवले. माँसाहेब जिजाऊंनी माया, प्रेम आणि संस्कार केले. स्वराज्याचे दुसरे छत्रपती घडवण्याची जबाबदारी जिजाऊंनी आपल्या खांद्यावर घेतली. शंभूराजांना आईची कसलीच उणीव भासणार नाही याची सर्वतोपरी खबरदारी जिजाऊंनी घेतली. वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी परिस्थितीने त्यांना राजकारणात ओढलं. मिर्झाराजे जयसिंग व दिलेरखानाच्या छावणीत ओलीस बनून राहावं लागलं. वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी त्यांना शिवरायांसोबत आग्र्याला जावं लागलं. असं म्हणतात की बाळाचे पाय पाळण्यात दिसतात पण शंभुराजेंच्या बाबतीत ते पाळण्यात तर दिसलेच पण ते पळण्यातही दिसले आणि जिवंतपनी जळण्यातही दिसले. आग्रा – मथुरा – राजगड नुसती धावा धाव कशासाठी तर स्वराज्यासाठी. जिवंतपणी मृत्यूचा अनुभव कशासाठी तर स्वराज्यासाठी. वयाच्या नवव्या वर्षी जिवंतपणी आपल्या निधनाची वार्ता ऐकण्याचा कटू अनुभव घेणारे संभाजी राजे हे जगातील एकमेव राजपुत्र. अन्न, पाणी, विश्रांती, सुख याचा कसलाही विचार न करता दुःखाला पाठीशी टाकत, संकटांना पायाखाली तुडवत स्वराज्य मार्गावरून चालत राहिले. ज्या वयात सुखाची ऊब घेत पांघुरणात लोळत पडायचं त्या वयात शंभूराजे मोघलांच्या धगीत आणि संकटांच्या, वाऱ्या वादळांच्या आगीत होरपळत राहिले व तावून सुलाखून निघाले. खरंतर मोठ्या वटवृक्षाखाली कोणतंही झाड उगवत नाही, उगवलं तर मोठं होत नाही, फुलत नाही, फलत नाही, पण संभाजीराजे उगवले आणि नुसते उगवलेच नाही तर फळाफुलांनी लगडलेला महावृक्ष झाले, कारण शिवराय नावाच्या वटवृक्षाने त्या रोपट्यावर सावली धरलीच नाही तर ऊन, वारा, पाऊस, थंडी,



वादळांच्या स्वाधीन केलं, संकटाच्या खाईत लोटलं त्यामुळे त्या वृक्षाची मूळ खोल गेली, पकड घट्ट झाली, फांद्या मजबूत झाल्या आणि एक महावृक्ष साकारला.

हजरजबाबीपणा, प्रसंगावधान, नम्रता, प्रेम , आपुलकी, जिव्हाळा, निर्भीडपणा, एक हळवं आणि झुंजार मन, शस्त्र आणि शास्त्रात पारंगत, अनेक भाषा अवगत असणारे, जिज्ञासू, बुद्धिमान, त्यागी, निर्भय, धाडसी, पराक्रमी हे सगळे अद्वितीय आणि अलौकिक गुण असणारे शंभुराजे गुणसंपन्नतेच्या कसोटीवर खरे उतरले. वयाच्या चौदाव्या वर्षी बुधभूषण सारखा अद्वितीय ग्रंथ लिहिणारे त्याचबरोबर नखशीख, नायिकाभेद, सातसतक असे एकाहून एक सरस ग्रंथ लिहिणारे शंभुराजे एक प्रतिभासंपन्न लेखक होते. त्यांच्यातील अफाट ज्ञान, बुद्धिमत्ता व प्रतिभा पाहून गागाभट्ट यांनी आपला समयनय हा ग्रंथ शंभूराजांना अर्पण केला.

स्वराज्यात शंभूराजांवर सतत आरोप झाले, त्यांचे विषय घेऊन न्यायनिवाडे उभे राहिले, अनेकदा त्यांना कटकारस्थान्यांनी आरोपीच्या पिंजऱ्यात उभा केलं, सतत ते खरे का खोटे हे पारखलं गेलं, ते हयात असताना आणि नंतरही हे अनेकदा झालं, त्यांच्याबाबत सुडाचे, द्वेशाचे, तिरस्काराचे राजकारण केले गेले पण ते पुरून उरले. त्यांच्यातील तेजाने या सर्वांवर मात केली. आणि सर्वांना दीपवून टाकले. शंभूराजांचे बालपण आणि तरुणपण स्वराज्याच्या पायात पूरलं गेलं म्हणून स्वराज्याच्या गडकोटांना आणि सिंहासनाला भक्कमपणा लाभला. शंभूराजांच्या बालपणापासून त्यांची सगळी वाटचाल मावळ्यांच्या आणि रयतेच्या साक्षीने सुरू होती. त्यामुळे मावळ्यांना आणि रयतेला शंभूराजांच्या डोळ्यात शिवरायांची स्वप्न दिसायची. मावळ्यांचा आणि रयतेचा शंभूराजांवरचा विश्वास कधीच तसूभरही ढळला नाही. बालपणीच कोवळ्या वयात आईचे सईबाईंचे मातृछत्र हरवले, त्यानंतर आजोबा स्वराज्य संकल्पक शहाजीराजे, आईची कसलीच उणीव भासू न देणाऱ्या आज्जी स्वराज्य जननी जिजाऊ, हिमालयासारखे उत्तुंग कर्तृत्व असणारे वडील, स्वराज्य निर्माते छत्रपती शिवाजी महाराज, पुतळामातोश्री, सोयरामातोश्री, हंबीरमामांसारखा खंबीर पाठीराखा अशी ही सगळी माणसं सोडून गेली पण रडत न बसता शंभुराजे स्वराज्य रक्षणासाठी तळहातावर प्राण घेऊन रात्रंदिवस लढत राहिले. पर्वता सारखे दुःख पाठीवर घेऊन झुंजत राहिले. हे सगळे कशासाठी तर भूमिपुत्रांच्या स्वराज्यासाठी, सुराज्यासाठी, माय माऊल्यांच्या, रयतेच्या लोककल्याणकारी राज्यासाठी. शंभुराजांची शिवनिष्ठा आढळ होती, ते शिवविचाराचे कट्टर समर्थक होते, ते शिवनीती, शिवसूत्र आणि शिवधर्माचे वाहक होते. *आबासाहेबांचे जे जे संकल्पित ते आम्हा करणे अगत्याचे* हे वचन डोळ्यासमोर ठेवून शंभूराजांनी राजा म्हणून नव्हे तर शिवरायांचा उत्तम मावळा म्हणून स्वराज्याचं रक्षण केलं आणि शिवरायांचे संकल्पित पूर्णत्वास नेले. नऊ वर्षांच्या कारकिर्दित अडीच हजार लढाया लढणारा आणि एकाही लढाईत पराभूत न होणारा अजिंक्य योद्धा म्हणजे छत्रपती संभाजी महाराज. त्यांचे प्रथम तसेच अंतिम ध्येय हे स्वराज्य आणि शिवरायांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचे रक्षण हेच होते. शंभूराजांच्या कर्तुत्वाने सह्याद्रीची मान उंचावत असे आणि भगव्याचा ऊरही अभिमानाने भरून येत असे. शंभूराजांनी शिवरायांचे सर्वधर्मसहिष्णुतेचे धोरण अत्यंत प्रखरपणे पुढे चालवले. धर्मामुळे राजा नसतो तर राजामुळे धर्म असतो हा शिवरायांचा विचार त्यांनी कायम ठेवला. शिवरायांनी हिंदू धर्मातून दुसऱ्या धर्मात गेलेल्यांना पुन्हा हिंदू धर्मात घेण्याचा क्रांतिकारक निर्णय घेतला व तशी कार्यवाही केली. शिवरायांचं तेच धोरण संभाजी राजांनी पुढे सुरू ठेवलं. स्वराज्यात धर्म एकच स्वराज्य धर्म आणि या स्वराज्य धर्माचा मंत्र सुद्धा एकच रयतेचं कल्याण. जिथे रयतेचं कल्याण असेल तिथे धर्म हा स्वराज्याच्या उंबरठ्याबाहेर असेल आणि जिथे आमच्या रयतेचे सुख असेल तिथे धर्मातील जातीपातीची कल्पना स्वराज्याच्या अंगणाबाहेर असेल असे संभाजी राजे ठणकावून सांगत. अठरापगड जाती धर्माच्या लोकांना एका सूत्रात बांधणारा वारकरी संतांचा विचार आणि शिव विचार शंभूराजांनी आपल्या खांद्यांवरून पुढे वाहिला. शिवरायांनी धर्माच्याच राज्याची स्थापना केली पण या धर्माचा पाया होता लोककल्याण, भयमुक्त आणि आनंदी जीवन, म्हणूनच जातीय धार्मिक विषमतेवर आधारलेल्या धर्माला स्वराज्यात स्थान नाही. आम्ही तेच धर्मपीठ मानतो ज्यात माणसामाणसांना जोडणारी खळ आहे माणसामाणसांना दूर करणारा खल नाही. शिवरायांनी सर्वसामान्य माणसांच्या मानगुटीवर अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धांचं गाठोडं कधीच दिलं नाही. ते सांस्कृतिक आणि धार्मिक गुलामगिरीचं ओझं फेकून देऊन परिवर्तनाच्या व प्रगतीच्या मार्गावरून चालायला शिकवलं. धर्मपिठाच्या मान्यतेपेक्षा लोकमान्यता महत्वाची मानली. धर्मपिठापेक्षा जात्यातून बाहेर पडणाऱ्या पिठाला शिवरायांनी जास्त महत्त्वाचं मानलं कारण ते माता माऊलींची ओवी ऐकत बाहेर येतं आणि भुकेल्यांची भूक भागवतं हा शिवविचार होता तो शंभूराजांनी प्राणप्रणाने जपला. एथ वडील जे जे करिती श्र तया नाम धर्मु ठेवती श्र तेची येर अनुष्ठीति श्र सामान्य सकळ श्रश्र या माऊली ज्ञानोबारायांच्या संत वचनाप्रमाणे किंवा सत्य तोची धर्म श्र असत्य ते कर्म श्रश्र आणिक हे वर्म श्र नाही दुजे श्रश्र या जगद्गुरु तुकोबारायांच्या संत वचनाप्रमाणे वडिलांचा सत्यधर्म पुढे चालवण्याचे काम छत्रपती संभाजी महाराजांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांचे वतनदारी बंद करण्याचे धोरण देखील अतिशय प्रतिकूल परिस्थितीत छत्रपती संभाजी महाराजांनी कायम ठेवले.

जग जिंकण्याचे सामर्थ्य बाळगणारा, अनुभवी, अफाट शक्ती असणारा आलमगीर औरंगजेब जेव्हा फक्त बावीस वर्षाच्या नवख्या राजासमोर हतबल होतो. सर्व शक्ती पणाला लावतो. दिल्ली सोडून स्वतः सगळी फौज घेऊन दख्खनेत येतो. स्वतःच्या डोक्यावरचा किमॉश उतरवतो. शंभूराजांचा पराभव केल्याशिवाय किमॉश डोक्यावर घालणार नाही अशी शपथ घेतो अर्थात सर्वस्व पणाला लावतो तेव्हा शंभूराजेंच्या अफाट आत्मबलाचा अंदाज येतो. जीव धोक्यात असताना देखील स्वराज्याचा खजिना कोठे आहे हे न सांगणारे तसेच स्वराज्याला मदत करणाऱ्या शत्रू पक्षातील सरदारांची नावे स्वतःचा प्राण वाचविण्यासाठी न सांगणारे छत्रपती संभाजी राजे तत्त्वनिष्ठ, शिवरायांनी निर्माण केलेल्या स्वराज्याशी बांधिलकी जपणारे महान राष्ट्रपुरुष ठरतात. मृत्यू समोर दिसत असताना देखील संभाजीराजांनी आपला प्राण वाचविण्यासाठी शिवरायांनी निर्माण केलेलं स्वराज्य औरंगजेबाच्या चरणावर ठेवलं नाही. त्यांनी दिलेलं बलिदान हे केवळ आणि केवळ स्वराज्याहितासाठी आणि स्वराज्यरक्षणासाठीच होतं हे लक्षात येतं. त्यांच्या बलिदानाला जगाच्या इतिहासात तोड नाही. आयुष्यभर चारित्र्यसंपन्न, निर्व्यसनी, निष्कलंक राहुन जिद्द, चिकाटी, सातत्य, दुर्दम्य आत्मविश्वास, प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची तयारी, प्रचंड इच्छाशक्ती, जाज्वल्यवृत्ती, मेहनत, संकटांवर थेट चालून जाण्याची हिम्मत अशा गुणांच्या जोरावर राष्ट्रनिर्मिती करून राष्ट्रासाठी बलिदान देणारे प्रजाहितदक्ष, कर्तृत्ववान शंभुराजे आजच्या युवकांसाठी व येणाऱ्या पिढ्यांसाठी कायम स्फूर्तीस्थान व प्रेरणास्थान आहेत त्यांच्या जयंतीदिनी पावन स्मृतीस विनम्र अभिवादन.

**– ह भ प संतोष महाराज डोंगरे,**
**जिल्हाध्यक्ष संत गाडगेबाबा प्रबोधन कक्ष बीड**

पान १ वरून पुढे...

## दहावीचा निकाल....

बसले आणि त्यापैकी १४,५५,४३३ विद्यार्थी पास झाले. यामुळे एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी ९४.१०% आहे.

खाजगी विद्यार्थ्यांमध्ये २८,५१२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २८,०२० विद्यार्थी परीक्षेस हजर झाले आणि २२,५१८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांची उत्तीर्णतेची टक्केवारी ८०.३६% आहे.

पुनर्परीक्षार्थी (जे विद्यार्थी नापास झाले होते आणि पुन्हा परीक्षा दिली) २४,३७६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २३,९५४ विद्यार्थी परीक्षेस बसले आणि ९,४४८ विद्यार्थी पास झाले. त्यांची उत्तीर्णतेची टक्केवारी ३९.४४% आहे.

नियमित, खाजगी आणि पुनर्परीक्षार्थी मिळून एकूण १६,१०,९०८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५,९८,५५३ विद्यार्थी परीक्षेस बसले आणि १४,८७,३९९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी ९३.०४% आहे.

दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये ९,६७३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ९,५८५ विद्यार्थी परीक्षेस बसले आणि ८,८४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांची उत्तीर्णतेची टक्केवारी ९२.२७% आहे.

मुलींनी मुलांपेक्षा चांगली कामगिरी केली आहे. सर्व विभागीय मंडळातून नियमित मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ९६.१४ असून मुलांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ९२.३१ आहे. म्हणजेच मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी मुलांपेक्षा ३.८३ ने जास्त आहे, असे बोर्डाने नमूद केले.

दहावी परीक्षेत घवघवीत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचं अभिनंदन खास शुभेच्छांनी

यावर्षी एकूण ६२ विषयांची परीक्षा घेण्यात आली. त्यापैकी २४ विषयांचा निकाल १००% लागला आहे, म्हणजे त्या विषयांमध्ये बसलेले सर्व विद्यार्थी पास झाले आहेत. माध्यमिक शालान्त (इ.१० वी) परीक्षा फेब्रुवारी–मार्च २०२५ करीता एकूण ६२ विषयांची परीक्षा घेण्यात आली. त्यापैकी एकूण २४ विषयांचा निकाल १००% टक्के लागला आहे, असे बोर्डाने सांगितले.

उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये ४,८८,७४५ विद्यार्थी प्राविण्यासह प्रथम श्रेणीत, ४,९७,२७७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ३,६०,६३० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत आणि १,०८,७८१ विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

राज्यातील २३,४८९ शाळांमधून १५,५८,०२० नियमित विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यापैकी ७,९२४ शाळांचा निकाल १००% लागला आहे. याचा अर्थ, या शाळांमधील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. राज्यातील २३,४८९ माध्यमिक शाळांतून १५,५८,०२० नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ७,९२४ शाळांचा निकाल १०० % लागला आहे, असे बोर्डाने सांगितले.

बोर्डाने मागील वर्षांचे निकालही सांगितले आहेत. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा मार्च–एप्रिल २०२२, मार्च २०२३, मार्च २०२४ व फेब्रुवारी–मार्च २०२५ च्या नियमित विद्यार्थ्यांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी लवकरच जाहीर केली जाईल.

एकंदरीत, यावर्षीचा निकाल चांगला लागला आहे. विद्यार्थ्यांनी चांगले यश मिळवले आहे. कोकण विभागाने नेहमीप्रमाणेच बाजी मारली आहे, तर नागपूर विभागाने अधिक सुधारणा करण्याची गरज आहे.

पान १ वरून पुढे...

## पहिल्याच अवकाळी...

शहरातील तमाम नागरिकांना पडला आहे स्वच्छते कडून सुंदर ते कडे जाण्याचा हाच मार्ग आहे का हे एकदा बीडच्या नगरपालिकेच्या सीईओ नीता अंधारे मॅडम यांनी स्वतःचे आत्मपरीक्षण करून पहावे आणि बीड करांना या घाणीच्या साम्राज्यापासून व या नाला आणि नाल्या मध्ये साचलेल्या कचरा नगर प्रशासनाच्या माध्यमातून कचरा स्वच्छ व साप नाल्या नाला करून या होणाऱ्या त्रासातून सुटका करावी आणि नगर प्रशासनाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांच्या बीड शहरातील सर्व नाली आणि नाला हे साफ करून घेण्यात यावे जेणेकरून भविष्यामध्ये लवकरच पाऊस जवळ येत आहे चार महिने पावसाचे कसे जायचे अशा जर नाल्या व नाला भरून लोकांच्या घरात पाणी जात असेल तर लोकांचे घरच वाहून जायला हॉटेल वाहून जायला वेळ देखील लागणार नाही असे सुसाट वेगाने पाणी लोकांच्या घरात शिरत आहे हा आज अंदाज बिडकर यांना आलेला आहे म्हणून बीड नगरपालिकेच्या सीईओ नीता अंधारे मॅडम यांनी तात्काळ या महत्त्वाच्या बाबीकडे लक्ष देऊन बीड शहरातील स्वच्छता आणि सुंदरता याकडे आपला भर देऊन बीड शहरातील लोकांचे आरोग्य कसे उत्तम ठेवता येईल याकडे लक्ष द्यावे असे दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात भारतीय जनता पार्टी नेते तथा बीड नगरपालिकेचे माजी सभापती या नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे

नसता बिलकरांना रस्त्यावर उतरावे लागेल आणि आम्ही त्यांच्या सदैव सोबत ठामपणे उभा राहू असा विश्वास ही भाजपा नेते नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी सर्व बीड शहरातील नागरिकांना दिला आहे म्हणून आता या कडे नगर प्रशासन कोणत्या दृष्टीने पाहते आणि बिडकर यांना या घाणीच्या साम्राज्यातून सुटका करून व नाली वनाला साफ करून न्याय मिळवून देते का हे देखील पाहणे गरजेचे असणार आहे.

## येऊर हिल्समध्ये...

ट्रान्सप्लांट करणारी डॉक्टर होती डेंटिस्ट, इंजिनिअर तरुणाच्या मृत्यूनंतर नवी माहिती समोर

'येऊर हिल्स परिसरातील हँगआउट बंगला २५ तरुणांना भाड्यासाठी देण्यात आला होता. या तरुणांनी पार्टीसाठी बंगला बुक केला असल्याची माहिती समोर आली. या २५ तरुणांसह १६–१७ वर्षांच्या १० अल्पवयीन मुली होत्या. हित टॉप व्हिला बंगल्यावर सामूहिक बलात्कार आणि विनयभंग झाल्याची नोंद वर्तक नगर पोलीस स्थानकात आहे. रात्री ११ पर्यंत सुविधा सुरु ठेवण्याची परवागनी उच्च न्यायालयाने फक्त २ हॉटेल्सना दिली आहे. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पोलीस आणि वन अधिकायांनीही उल्लंघन केले आहे अशी एक्स पोस्ट जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील येऊर येथे काही वर्षांपासून बेकायदेशीर बांधकामे उभी करण्यात आली आहे. तेथील वनक्षेत्रांमध्ये अनेकदा रात्रीच्या वेळेस पाटर्चा केल्या जातात. तेथे काही दिवसांपूर्वी बलात्काराची घटना घडली होती. बलात्काराच्या घटनेनंतर पुन्हा येऊरमध्ये पाटय झाल्या. जितेंद्र आव्हाड यांनी हे प्रकरण लावून धरले. आव्हाड यांची कन्या नताशा आव्हाडने पर्यावरणवादी कार्यकर्त्यांसह येऊनच्या उपवन येथील प्रवेशद्वाराजवळ आंदोलन केले होते.

पान १ वरून पुढे...

## मुख्यमंत्री देवेंद्र...

राहण्याचे आश्वासन दिले. सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी नुकतीच मुख्यमंत्री श्री. फडणवीस आणि उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी गोव्यातील फोंडा येथील फर्मागुडी अभियंता महाविद्यालयाच्या प्रांगणात १७ ते १९ मे २०२५ दरम्यान होणाऱ्या 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा' ची माहिती दिली. या वेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट सांगितले, हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण आहे. मी याचा अवश्य लाभ घेईन. या भेटीदरम्यान श्री. वर्तक यांच्यासमवेत महाराष्ट्र व छत्तीसगड राज्यांचे राज्य संघटक श्री. सुनील घनवट, तसेच भाजपाचे नागपूर येथील आमदार व माजी मंत्री डॉ. परिणय फुके हेही उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांची भेट घेताना राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री श्री. भरतशेठ गोगावले हेही उपस्थित होते. त्यांनाही निमंत्रण देण्यात आले असून ते देखील कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या महोत्सवात देशभरातील संत, महंत, धर्माचार्य, विचारवंत आणि धर्मप्रेमी नागरिक हजारोंच्या संख्येने सहभागी होणार असून, सनातन राष्ट्राच्या स्थापनेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून हा कार्यक्रम घडवला जात आहे.

## बीड तहसीलदार...

अक्षरश: लाईटचे पोल आणि झाडे मुळासगट खाली कोसळले . यामध्ये सिमेंटच्या घराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले .एवढेच नव्हे तर वादळ वार्यामुळे हातावर पोट असणार्या गोरगरीब लोकांच्या पत्र्याचे शेड उडून गेल्याने त्यांचा संसार उघड्यावा आला. अशी परिस्थिती पाहता साहस आदोडे यांनी बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना भ्रमणध्वनीवरून प्रभाग क्रं.२४ मध्ये झालेल्या विविध नुकसानीची माहिती सांगितली. अवघ्या काही मिनीटात बीड तहसील येथे कर्तव्यावर जाण्या अगोदर परिस्थितीची जाणीव ठेवून तलाठी, मंडळाधिकारी सरकारी गाडीसह प्रभाग क्रं.२४ मध्ये येऊन विविध ठिकाणी पाहणी केली. जाग्यावरच तलाठ्यांना पंचनामा करण्याच्या सूचना दिल्या. त्याच बरोबर वीज विभागाला सुचना जातील आणि तातडीने पडलेले पोल उभा करून तातडीने लाईट सुरू करण्यासाठी आश्वासन दिले. त्याचबरोबर पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात घरात गेल्याने संसारोपयोगी वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले दिसून आले. शासनाकडून या नुकसानग्रस्तांना तातडीने मदत मिळावी यासाठी साहस आदोडे यांनी बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्याकडे मागणी केली. तातडीने नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली . नुकसानग्रस्तांची भेट घेतली. त्यामुळे येथील नागरीकांनी बीड तहसीलदार , मंडळाधिकारी,तलाठी यांचे आभार मानले.

## खदानीत सौर...

एजन्सीद्वारे सौर ऊर्जा पॅनल बसवण्याचे काम मागील आठवड्यापासून सुरू आहे. या कामावर अभियंता म्हणून सचिन गोरे आणि त्यांचे आठ साथीदार काम करीत होते. दरम्यान आज (मंगळवारी) दुपारी सचिन केरबा गोरे आणि त्याचे साथीदार सचिन चंद्रकांत पवार ( रा. लातूर), राहुल रविंद्र होदाडे, ओमकार सोमनाथ खोकडे ( दोघे रा. नायगाव ता. कळंब जि. धाराशिव) आणि वैभव बालाजी माके ( रा. लातूर) हे चौघे दुपारच्या वेळी खडी क्रेशर जवळ असलेल्या खदाणीत पोहण्यासाठी उतरले. यावेळी सचिन गौरे हा पाण्याचा अंदाज न आल्याने बुडू लागला. ही बाब त्याच्या

पान ४ वरून पुढे...

साथिदारांच्या निदर्शनास येताच त्यांनी आरडाओरड केली. त्याला विचविण्याचा प्रयत्न केला, मात्र तो काही अंतरावरून दिसेनासा झाला. अग्निशमन दलासह माजलगाव येथील खाजगी पाणबुड्यांमार्फत त्याचा शोध सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच केज उपविभागाचे सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना आणि पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी घटनास्थळी भेट दिली.

## श्री महालक्ष्मी...

मिळवून द्वितीय आणि चि. शरद शेंडगे याने ९०.८० टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक मिळवला आहे. कु. सपना शिंदे हिने ९०.२० गुण मिळवून चौथा क्रमांक चि. जैद सय्यद ९०.०० गुण घेत पाचवा क्रमांक मिळविला तर कु. शुभांगी सोलनकर हिने ८९.६० गुण घेत सहावा क्रमांक मिळवला आहे. दहावी परीक्षेतील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा तथा जेष्ठ मार्गदर्शिका सौ. सुदामतीताई वाघ मॅडम, संस्थापक सचिव तथा जेष्ठ मार्ग दर्शक श्री. गोविंदराव वाघ साहेब, संस्थेचे अध्यक्ष श्री. गणेश वाघ सर , सचिव श्री. नामदेवराव वाघ सर यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक श्री. दत्तात्रय चव्हाण सर, श्री. आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती साळुंके मॅडम, श्रीमती सानप मॅडम गणेश श्री गुजर सर यांच्यासह शिक्षक व सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी, शिदोड येथील शिक्षण प्रेमी नागरिक आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## द. बा. घुमरे...

कु. नागरगोजे तनिषा शिवाजी ९३.२०%, कु. मुंडे साधना माणिक ९३.२०%, कु. काकडे धनश्री बबन ९३.२०%, कु. खाडे समृद्धी लक्ष्मण ९३.२०%, चि. खाडे सार्थक दिनकर ९३.२०%, कु. लांडे ऋतुजा कृष्णा ९३.२०%, कु. जवंजाळ ऋतुजा विष्णू ९३%, कु. बांडे अनुष्का गोकुळ ९२.८०% चि .शिंदे विशाल जयराज ९२.४०, चि. ढाळे अविष्कार दिलीप ९२.२०%, चि. मिरगणे साहिल बाळू ९२.२०%, चि साळुंखे साहिल संजय ९२ %, कु. वडमारे श्रुती मोहन ९२ %, जवंजाळ ओंकार हनुमान ९१.८०%, कु. डावकर सिद्धी अंगद ९१.८०%, चि. दराडे विशाल शिवाजी ९१.८०%, कु चोपडे रिया राहुल ९१.८०%, चि. आरगडे यशराज अशोक ९१. ६०%, कु. भांगे समीक्षा धनंजय ९१.६०%, चि. हुंबे प्रेम संदिपान ९१.६०, कु. मुळे श्रावणी महेश ९१.५०%, कु. घोडके ईश्वरी रामदास ९१.४०, चि. जानवळे वेदांत कल्याण ९१.४०%, कु. परसकर प्राची प्रभाकर ५१.२०%, चि चव्हाण पवन युवराज ९१%, कु कराड जान्हवी दत्तात्रेय ९०.८०%, कु. घोडके अमृता गोकुळ ९०.८०%, कु. मोरे वैष्णवी संतोष ९०.६०, कु. भोगे श्रावणी विनोद ९०.६०%, कु. शिंदे श्रद्धा दादाराव ९०.२०%, कु. गोंडे किरण काकासाहेब ९०.२०%, कु. घोळवे श्रुती अजिनाथ ९०%, कु.जाधव कोमल गणेश ९०% इत्यादी ४४ विद्यार्थी ९०% गुण घेऊन विशेष प्राण्यास उत्तीर्ण झालेले आहेत तसेच इतर विद्यार्थी विशेष प्राविण्य व प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत शाळेच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव श्री दीपकदादा घुमरे सर संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती मंजुश्री घुमरे मॅडम शाळेचे मुख्याध्यापक(माद्य) श्री शेंडगे एम आर परीक्षा विभाग प्रमुख श्री पवार एस बी शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी व पालक यांनी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# अवघी दुमदुमली नेकनुर नगरी...

## 1 लाख भाविकांच्या उपस्थितीत संत बंकटस्वामीच्या 81 व्या पुण्यातिथी उत्सवाची थाटात सांगता

- वारकरी संप्रदाय विस्तारात संत बंकटस्वामींचा सिंहाचा वाटा : संदीपान महाराज हासेगावकर,
- वारकरी संप्रदायावर खूप मोठे उपकार : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, बंकटस्वामी महाराज संस्थानने सामाजिक सलोख्याचा आदर्श घालून दिला: मनोज दादा जरांगे
- बंकटस्वामी संस्थांचा मी सेवक : खा बजरंग सोनवणे, संत बंकटस्वामी संस्थांच्या विकासासाठी पाठपुरावा करणार :आमदार नमिता मुंदडा





▶ सप्ताहामध्ये महाप्रसाद 100 पोते साखर , ६0 क्विंटल दाळ तर तेल ४0 टाकी आणि 1000 पोते मुरमुरे यामुळे 1 लाख ते दीड लाख भाविक भक्तगण प्रसाद घेवुन तृप्त झाले. भाविक भक्तांसाठी जार च्या थंडगार पाण्याची व्यवस्था केली होती.

▶ महापंगतीमध्ये प्रसाद वाढण्याचे महत्वाचे काम नेकनूरच्या महिलां ग्रुप यांनी केले.यामुळे प्रत्येकाला महाप्रसाद वेळेवर मिळाला.विशेष म्हणजे. 1000 महिलांनी हें काम पार पाडलें.

▶ नेकनूर मधील गणेश मंडळाच्या तरुण मंडळानी पार्किंग, पाणी, स्वच्छता, सुरक्षा, सर्व चोख व्यवस्था करण्यासाठी मोठी मेहनत घेतली. अन्नदान कमेटीने सर्वांनां मार्गदर्शन केले.

**नेकनूर । प्रतिनिधी**

वारकरी संप्रदायाचे भक्ती सूर्य महान संत वै बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवाची मंगळवारी दुपारी काल्याच्या कीर्तनांने थाटात सांगत झाली. सकाळी समाधी अभिषेक करण्यात आला तर दुपारी ११ ते २ या वेळेत श्री ह भ प गु नाना सिंधू संदिपान महाराज हासेगावकर यांचे सुश्राव्य काल्याचे कीर्तन संपन्न झाले. या सोहळ्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखों भाविक भक्तांनी उपस्थिती लावली होती. यात प्रमुख संत महंत उपस्थिती श्री प्रमुख उपस्थिती.महादेव महाराज तात्या श्रीक्षेत्र चाकरवाडी, श्री ह भ प अक्षय महाराज भोसले शिवसेना आध्यात्मिक आघाडीचे अध्यक्ष , श्री ह भ प ज्ञानेश्वर माऊली मंझरीकर ज्येष्ठ कीर्तनकार, श्री ह भ प महंत नवनाथ महाराज जरूड महंत हरिहर भारती महाराज ,स्वामी स्वरूपानंद सरस्वती,रामहरी महाराज डबरे , रामेश्वर महाराज हंगेवाडीकर ,आदिकनाथ महाराज ,मुरलीधर महाराज बारगजे ,सतीश महाराज तट,ज्ञानेश्वर महाराज पिसे,सत्यवान महाराज लाटे ,सोपान महाराज खोंड दत्त संस्थान,प्रशांत महाराज क्षीरसागर ,नरेश महाराज संगमेश्वर मंदिर इटवाडा,विठ्ठल महाराज आंधळे शास्त्री,गणेश महाराज आमटे,विष्णुपंत महाराज लोंढे गुरुजी ,अर्जुन महाराज शिंदे,हरिदास भाऊ जोगदंड ,अरुण नाना डाके, विष्णूदास महाराज सुरवसे, नाना महाराज कदम, सुरेश महाराज जाधव, गणेश महाराज बांडे यांचे उपस्थिती होती.

तर सामाजिक व राजकीय उपस्थिती, खासदार बजरंग सोनवणे, आमदार माजी मंत्री सुरेश धस, आमदार नमिता मुंदडा, डॉ ज्योतीताई मेटे,रमेश आडसकर (स्वागत), सचिन मुळीक,राष्ट्रवादी ओबीसीचे नेते कल्याण काका आखाडे,गंगाधर नाना काळकुटे ,गणेश वरेकर , गोरख सिंघन ज्येष्ठ नेत्या सुशीलाताई मोराळे , विजयराजजी बंब , नानासाहेब काकडे पाटील. नितीन धांडे बबन गवते,सुग्रीव रसाळ,यांच्या सह बंकटस्वामी संस्थान चे सर्व विश्वस्त उत्सव कमेटी नेकनूर पंचक्रोशी व हजारो भाविकांची उपस्थिती होती.

वारकरी संप्रदाय विस्तारात संत बंकट स्वामी यांचा सिंहाचा वाटा आहे. वारकरी शिक्षण संस्थेचे २४ वर्ष अध्यक्ष म्हणून काम पाहिले. या कालावधीमध्ये वारकरी शिक्षण संस्थेला स्थैर्य मिळवून दिले. असं संदिपान महाराज हासेगावकर म्हणाले.

यावेळी कीर्तनात साथ संगत बंकटस्वामी महाराज फडावरील सर्व टाळकरी मंडळी व गुंजन गायक वादक मंडळी यांची उपस्थिती होती. शेवटी काल्याच्या अभंग म्हणून दहीहंडी फोडुन महाप्रसाद वाटप करण्यात आला , लाखोंच्या पंगतीत मध्ये बूंदी आणि चिवडा याचा महाप्रसाद वाटप करण्यात आला. महाप्रसाद वाटप करण्याचे महत्त्वाचे काम एकनाथ मधील महिला ग्रुप आणि तरुण मित्र मंडळांनी केले तर जारच्य पाण्याची देखील व्यवस्था करण्यात आली होती.

वारकरी संप्रदायावर खूप मोठे उपकार – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे.. दूरध्वनी वरून साधला भाविकांशी संवाद..

– जोग महाराजांचे पट्ट शिष्य संत बंकट स्वामी महाराज यांचे वारकरी संप्रदायावर खूप मोठे उपकार आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी त्या कालावधीमध्ये खूप मोठी किर्तन भजन करणारी पिढी घडवली.मी आज या कार्यक्रमासाठी येणार होतो मात्र कॅबिनेटची मीटिंग असल्यामुळे मला या कार्यक्रमात सहभागी होत आले नाही त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो असे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरध्वनीच्या माध्यमातून सांगितले. यावेळी उपस्थित असलेल्या जनसमुदायाशी दूरध्वनीवरून संवाद ही साधला.. मी सामान्य वारकरी कुटुंबातील आहे वारकऱ्यांना कुठलीच गोष्ट कमी पडणार नाही यासाठी सदैव तत्पर राहील, बंकट स्वामी महाराज संस्थान च्या विकासासाठी दिलेला शब्द खाली पडू देणार नाही असेही ते म्हणाले..

मनोज जरांगे पाटील यांचा दूरध्वनीवरून भाविकांशी संवाद.. सामाजिक परिस्थितीमध्ये विश्वास ठेवण्यायोग्य संत बंकटस्वामी महाराज यांचे व्यासपीठ – मनोज जरंगे पाटील

– संत बंकट स्वामी महाराजांनी सर्व जाती धर्मातील शिष्य घडवले. आजच्या सामाजिक परिस्थितीमध्ये विश्वास ठेवण्यासारखे एकच व्यासपीठ शिल्लक आहे ते म्हणजे संत बंकट स्वामी चे धार्मिक व्यासपीठ आहे. आजारपणामुळे येता आले नाही भाविकांची दिलगिरी व्यक्त करतो, सेवक म्हणून लक्ष्मण मेंगडे महाराजांचा शब्द कधीच खाली पडू देत नाही..

बंकटस्वामी संस्थांचा मी सेवक – खा बजरंग सोनवणे , वारकरी संप्रदायात संत बंकट स्वामी यांचे खूप मोठे योगदान आहे. आज या कार्यक्रमात उपस्थित होण्याचे भाग्य लाभले, किर्तनही ऐकायला मिळाले. मी बजरंग बली आहे माझ्याकडे सेवेच काम आहे, संस्थांच्या विकासाचा द्रोणागिरी आणि संजीवनी घेऊन येण्याचं काम करेल, महंत लक्ष्मण महाराज आणि श्रीराम प्रभूच्या भूमिकेत असलेल्या संतांनी मला आदेश द्यावा तो पूर्ण करेल असेही बजरंग सोनवणे म्हणाले.

संत बंकटस्वामी संस्थांच्या विकासासाठी पाठपुरावा करणार– आमदार नमिता मुंदडा,संत बंकट स्वामी महाराज संस्थान च्या विकासासाठी या अगोदरही निधी दिलेला आहे कीर्तन मंडपासाठी निधी दिलेला आहे तर तीर्थक्षेत्र विकास मधून व पर्यटनमधूनही मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून मूलभूत कामे केली जातील. संस्थांच्या विकासाच्या बाबतीत आम्ही कुठेही मागे पडणार नाही असं आ.नमिता मुंदडा यांनी सांगितलं.

# आदर्श देवगाव प्रीमियर लीग प्रथम पारितोषिक स्वराज्य क्रिकेट क्लब देवडी

## द्वितीय पारितोषिकचे मानकरी महाराष्ट्र नागरी वारीयर्स



- मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण

**वडवणी । प्रतिनिधी**

तालुक्यातील आदर्श देवगांव या ठिकाणी गेल्या काही दिवसांपूर्वी क्रिकेट प्रीमियर लीगच्या स्पर्धा चालू होत्या प्रीमियर लीग आज मेगा फायनल रींलह स्वराज्य क्रिकेट क्लब देवडी vs महाराष्ट्र नागरी वारीयर्स यांच्या मध्ये झाला व स्वराज्य क्रिकेट क्लब यांनी यामध्ये प्रथम पारितोषिक पटकावले.प्रथम पारितोषिक परडी माटेगाव सरपंच माधव काका शेंडगे व माऊली दादा सुरवसे यांच्या संयुक्त विध्यमाने(३३३३३) देण्यात आले तसेच द्वितीय पारितोषिक चे मानकरी महाराष्ट्र नागरी वारीयर्स यांना मिळाले .द्वितीय पारितोषिक शेतकरी नेते जगदीश काका फरताडे यांच्या वतीने (१७७७७)देण्यात आले तसेच लीग चे तिसरे पारितोषिक आदर्श क्रिकेट क्लब यांना देण्यात आले .त्याचे मानकरी उपसरपंच महादेव अण्णा सुरवसे यांच्या वतीने( ११११११) देण्यात आले व बेस्ट बॉलर म्हणून पर्पेल कॅम्प सखाराम सुरवसे यांना देण्यात आली .पार्पेल कॅम्प चे मानकरी ग्रा.प.सदस्य गणेश निवृती गवळी यांच्या वतीने (२५००) देण्यात आले त्याच बरोबर ीरपसश कॅम्प (बेस्ट बॅट्समन ) हा पुरस्कार राहुल पवार यांना देण्यात आला.याचे मानकरी दिनकर भैय्या सुरवसे यांच्या देण्यात (२५००) देण्यात आला व ारप ऑफ the serise दिनेश पैठेने यांना देण्यात आला त्याचे मानकरी नक्ष मारोती सुरवसे यांच्या वतीने(३१००) देण्यात आला.

# माजी सभापती अशोक डक यांनी रामनगर तांड्यावरचा पाणी प्रश्न कायमचा मिटवला

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील छोटीवाडी जवळ असलेल्या रामनगर तांडा येथे सध्या पाणी प्रश्नपत्रिका झाला होता. मुंबई बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक हे या ठिकाणी गेले या ठिकाणचा पाणी प्रस्थापित झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तात्काळ या ठिकाणी बोर घेण्यास सांगितले व दुसऱ्या दिवशी या ठिकाणी बोअरवर मोटर टाकून संपूर्ण तांड्याचा बिकट झालेला पाणी प्रश्न सोडवला.



तालुक्यातील छोटेवाडी (रामनगर तांडा) येथील माजी सरपंच विनायकराव राठोड यांचे निधन झाले होते. त्यामुळे मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा. सभापती अशोक डक हे त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी गेले होते . यावेळी नागरिकात या ठिकाणी असलेले हातपंप बंद झाल्याने येथील पाणी प्रश्न गंभीर झाला असल्याचे त्यांच्या बोलण्यावरून लक्षात आले. त्यानंतर त्यांनी गावातील नागरिकांसोबत गावातील पाणी प्रश्नाबाबत चर्चा केली. असता अशोक डक यांनी ताबडतोब स्वखर्चाने बोर मशीन बोलावली व या ठिकाणी तात्काळ बोअर घेतला. याला पाणी देखील भरपूर लागल्याने सोमवार रोजी अशोक डक यांनी बोअरची मोटार, पाईप, व त्यासाठी लागणारे सर्व साहित्य देऊन गावातील नागरिकांसाठी पिण्याचा पाण्याचा मिटवला.

तांड्यावरील पिण्याचा पाणी प्रश्न सोडवल्यात बद्दल अशोक डक यांच्या हस्ते बोअरचे पूजन करण्यात आले व त्यांच्या हस्ते मोटार सुरू करून तांडयात पाणी सोडण्यात आले. रामनगर तांड्याचा पाणी प्रश्न सोडवल्यामुळे छोटेवाडी व रामनगर तांड्यावरील ग्रामस्थांनी अशोक डक यांचा सत्कार करून आभार मानले यावेळी छोटेवाडी गावचे सरपंच अंगदराव कटके,वैजनाथ कटके, देवींनाथ चव्हाण, अशोक माळेकर, लक्ष्मण चोरगे, महेश सोळंके, सतीश राठोड, वसंत राठोड, राहुल मापाडे, राजेश राठोड, आदी उपस्थित होते

# नववधुचे प्रियकरासोबत पलायन

**बीड । प्रतिनिधी**



प्रत्येक मायबापांनी पाहिलेले स्वप्न असतं की आपल्या देखत मुला बाळांचे हात पिवळे होऊण त्यांचा सुखी संसार व्हावा आणि आपल्या कर्त्वयातुन पार पडावे एवढीच माफक अपेक्षा आसते, परंतु सध्या काय घडेल याचा नेम नाही ! आशीच घटणा बीड मध्ये घडली आसुण या घटणेची सध्या जोरदार चर्चा रंगली आहे.

प्रेम आणि युद्धात सगळ माफ आसते आसे म्हणतात पण मायबापाच्या इज्जतीचे लक्तरे पार वेशी टांगुन समाज तोंड दाखवायच्या लायक न ठेवणे हि बाब सामाजिक दृष्ट्या अत्यंत गंभीर आहे. अशीच एक अजब घटना आता समोर आली आहे. अंगावरची हळद उतरण्याआधीच नवरी प्रियकरासोबत पळून गेल्याची धक्कादायक घटना बीडमध्ये घडली आहे. नातेवाईकां कडून वधूची शोधाशोध सुरू झाली. मात्र, वधू सापडली नाही. अखेर वधूच्या पित्याने या प्रकरणी तक्रार देखील नोंदवली. केज तालुक्यात ही घटना घडली आहे.

९ मे रोजी वडिलांनी लेकीचं धुमधडाक्यात लग्न लावलं, १० मे रोजी नवरीने देवदर्शन देखील केलं, त्यानंतर सासरहून तिची माहेरी पाठवणी करण्यात आली. सगळे आनंदात होते मात्र नवरीच्या मनात काही तरी भलतच सुरू होती.

माहेरी आल्यानंतर रात्री शौचाला बाहेर जाण्याच्या बहाण्याने भावजईचा फोन घेतला आणि शेजारच्या गावात राहणाऱ्या प्रियकराला फोन केला, त्यानंतर घरी येऊन झोपली. लग्नाच्या गडबडीमुळे थकलेले सगळे नातेवाईक गाढ झोपलेले असताना हीच संधी साधत नवरीने घरातून धूम ठोकत पोबरा केला आसुण दोन्ही कुटूंबातील सदस्यांसह नातेवाईक आप्तेष्ठ आणि हितचिंतकांमध्ये नैराश्याची भावना निर्माण झाली आहे

### पाणीपुरवठा योजना व सामाजिक वनीकरण बाधित होणार असल्याने..

# वनविभागाला गायरान जमिन देण्यास महाजनवाडीकरांचा विरोध

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील महाजनवाडी ग्रामपंचायत अंतर्गत २५ वर्षांपासून झाडे लाऊन जोपासलेली व संपूर्ण गावाची पाणीपुरवठा योजना व सामाजिक वनीकरण क्षेत्र बाधित होणार असल्याने जिल्हाधिकारी बीड यांनी काळु नदीवरील नियोजित प्रकल्पांमधील वन जमिनीच्या बदल्यात बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील ४० हेक्टर जमिन वनविभागाच्या ताब्यात देण्याचे आदेश काढले असुन वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी तशा हालचाली सुरू केल्या असुन महाजनवाडी ग्रामस्थांनी एकमुखाने ठराव घेऊन विरोध दर्शविला असुन तसे जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन दिले असुन गावकरी आंदोलनाच्या पवित्र्यात



असल्याचे सरपंच विश्वंभर गिरी,माजी सरपंच दत्ता घरत, तंटामुक्ती अध्यक्ष बाबुराव जगदाळे व ग्रामस्थांनी सांगितले आहे. महसूल व वनविभाग शासन परिपत्रक दि.२८.०५.२०१० अन्वये ज्या प्रयोजनासाठी शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रत्यायोजित केलेले आहेत.त्या प्रयोजनासाठी जमिनीचा आगाऊ ताबा देण्यापुर्वी ग्रामसभेचा संमतीदर्शक ठराव असल्याची खात्री जिल्हाधिकारी यांनी करावी असे नमूद केले आहे. ग्रामपंचायतने तसा कोणताही संमतीदर्शक ठराव दिलेला नाही. गावाने २५ वर्षांपासून कोणतेही अतिक्रमण न होऊ देता झाडांची लागवड करून जोपासल्याने सामाजिक वनीकरण विभागाकडून २ वेळेस राज्यस्तरीय पुरस्कार गावाला मिळाले आहेत. गेल्यावर्षी सामाजिक वनीकरण विभागामार्फत ३० हजार झाडांची लागवड केली असुन पुढच्या वर्षी ते ग्रामपंचायतीच्या ताब्यात मिळणार आहे. ग्रामस्थांनी बैठकीत एकमुखाने वनविभागाच्या ताब्यात जमीन देण्यास विरोध केला असुन दि.२३ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी यांना ग्रामस्थांच्या स्वाक्षरीने लेखी निवेदन दिले असल्याचे सरपंच विश्वंभर गिरी यांनी सांगितले.

गावची लोकसंख्या २५०० च्या आसपास असुन गाव आणि वस्त्यांना पाणी पोहोच करणा–या ग्रामीण पाणीपुरवठा करणाऱ्या २ विहिरी,जलयोजना याच गायरान जमिनीवर आहेत. तसेच ४ बोअरवेल तसेच गावाच्या पाणीपुरवठा विहिरीच्या वरच्या बाजूला पाझर तलाव घेतलेला आहे.तसेच आजुबाजुच्या कोंबडवस्ती,तुकाई वस्ती यांना पाणीपुरवठा करण्यासाठी पाण्याच्या टाकीचे बांधकाम करण्यात आले असुन वनविभागाच्या ताब्यात जमीन दिल्यास भविष्यात वनविभागाचे नियम पाहता ग्रामस्थांना पाण्यासाठी मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागणार असल्याने ग्रामस्थांचा याला विरोध असल्याचे माजी सरपंच दत्ता घरत यांनी सांगितले.

फुकेवाडी ग्रामस्थांनी वारंवार निवेदने ,आंदोलने करूनही काही उपयोग झाला नाही.भविष्यात तीच वेळ आमच्यावर येऊ शकते त्यामुळे ग्रामस्थांचा विरोध असल्याचे तंटामुक्ती अध्यक्ष बाबुराव जगदाळे यांनी सांगितले.

# डॉ. उत्कर्ष महादेव शिंगणे यांचे दु:खद निधन



**बीड । प्रतिनिधी**

दीप हॉस्पीटल बीड येथील डॉ. महादेव शिंगणे यांचा मुलगा उत्कर्ष एम्स भोपाळ येथे चइइड चे शिक्षण घेत होता त्याचा सोमवारी पहाटे दुर्दैवी अंत झाला, उत्कर्षला छएएढ परीक्षेत ७२० पैकी ७१० मार्क आले होते. डॉ. शिंगणे हे माजलगाव तालुक्यातील देवळा या गावचे रहिवाशी आहेत. शिंगणे यांच्या दु:खात दैनिक मराठवाडा पत्र परिवार सहभागी आहे. भावपूर्ण श्रद्धांजली उत्कर्ष.


दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
बुधवार, दि.१४ मे २०२५ पान ४




## इयत्ता दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे दै. मराठवाडा पत्र तर्फे हार्दिक अभिनंदन



नाईकवाडे हर्षदा हनुमंत (९७.००%)



व्यंकटेश सुभाष खजानदार (९६.६०%)



जाधव गौरी आण्णासाहेब (९२.४०%)



गोरे ओमकार अशोक (९०.४०%)



पृथ्वीराज राम यादव (९०.०२%)



लंगे निकुज श्रीराम (८९.६०%)



घुमरे करण हारिचंद्र (८७.८०%)



पवार निशा अनिल (८५.००%)



भांगे ज्ञानेश्वरी मोहन (८४.४०)



वाव्होळे सृष्टी विकास (८४:४० %)



खराडे प्रतिक्षा फुलचंद (७९.२०%)

### शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचालित शिदोड येथील...

# श्री महालक्ष्मी विद्यालयाची दहावीच्या परीक्षेत यशाची परंपरा कायम

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरापासून जवळच असलेल्या शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाने दहावी परीक्षेत यशाची परंपरा कायम ठेवली आहे. दरवर्षीप्रम णे याही वर्षी प्रथम क्रमांक मिळवण्याचा मान विद्यार्थीनीने मिळवला आहे. कु. अनुष्का धुमाळ हिने ९४.०० टक्के गुण मि ळवून प्रथम क्रमांक पटकावला तर प्रथमेश काकडे याने ९१.०० गुण मिळवून द्वितीय आणि शरद शेंडगे याने ९०.८० टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक मिळवला आहे. या बाबत अधिक माहिती अशी की फ ेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल आज मंगळवार दिनांक १३ मे रोजी दुपारी १.०० वाजता ऑनलाइन जाहीर झाला. या परीक्षेमध्ये बीड शहरापासून जवळच असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाचा शेकडा ९४.३३ टक्के इतका लागला असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शाळेने आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली. यावर्षी दहावीच्या परीक्षेसाठी शाळेतून एकूण ५८ परीक्षार्थी परीक्षेस बसले होते. त्या पैकी ५५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या ५५ पैकी ५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यामुळे शाळेचा शेकडा ९४.५४% टक्के निकाल लागला आहे. यामध्ये कु. अनुष्का धुमाळ हिने ९४.०० टक्के गुण मि ळवून प्रथम क्रमांक पटकावला तर चि. प्रथमेश काकडे याने ९१.०० गुण ▶▶ उर्वरित पान २ वर







### शाळेचा शेकडा ९४.३३% टक्के निकाल!

# द. बा. घुमरे पब्लिक स्कूल बीड शाळेची १००% निकालाची परंपरा कायम

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी राजे शिक्षण प्रसारक मंडळ पारगाव (घुमरा) ता. पाटोदा जि. बीड संचलित द. बा. घुमरे पब्लिक स्कूल (मा) बीड या शाळेचा एस. एस. सी बोर्ड इ. १० वी परीक्षेचा निकाल प्रतिवर्षाप्रमाणे १००% लागला आहे. शाळेतून १११ विद्यार्थी एस. एस. सी बोर्ड परीक्षा मार्च २०२५ साठी बसले होते. हे सर्व विद्यार्थी अतिशय उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले यामध्ये विशेष प्राविन्यासह - ९९, प्रथम श्रेणी - १२, याप्रमाणे गुणांनी १००% विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.असून यामध्ये ४४ विद्यार्थी ९०% पेक्षा जास्त गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये कु. बोबडे विश्वजा बबन ९७% टक्के गुण घेऊन प्रथम तर कु. मुसळे सिद्धी दशरथ ९५.४०% गुण घेऊन द्वितीय तसेच कु. पवार सार्थकी गोपाळ ९४.८० व कु. जाधव वर्षा बाबू ९४.८० चि. जोगदंड स्वप्निल गणेश ९४.८०% गुण घेऊन यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच कु हाडुळे तनुजा बाळू ९४.२०% कु. पांचाळ साक्षी कैलास ९४% कु सिरसट पूजा मदन ९४% चि. ताटे प्रेम राजू ९३.८०% कु. चाटे कल्याणी अविनाश ९३.६०%, कु. जवंजाळ रुपाली शहादेव ९३.२०%,

▶▶ उर्वरित पान २ वर



## बीडच्या गौरी जंवजाळ या कन्येचं पहिल्याच प्रयत्नात मोठं यश

**गेवराई । प्रतिनिधी**

आयुष्यात यशस्वी व्हायचे असल्यास धैय्य बाळगावे लागते. नुसते धैय्य बाळगून उपयोग नाही तर ते पूर्ण करण्यासाठी इच्छा शक्ती ही हवीच असते. याच इच्छा शक्तीचा प्रत्यय बीड येथील शालेय विद्यार्थिनीने दाखवला आहे. अभ्यासाच्या जोरावर हे शक्य असल्याचे तीने हेरले. प्रचंड इच्छाशक्तीवर तीने अभ्यास करत अखेर दहावीच्या परीक्षेत यश मिळवले. जिद्द चिकाटी आणि सातत्याच्या बळावर तिने हे यश संपादन केले आहे रोज तासन् तास अभ्यास करीत होती. त्या माध्यमातून यशापर्यंत पोहचली. पहाटेचं जागून अभ्यास करायचा आणि शेवटी आपल्याला हवं ते यश खेचून आणायचं, ही गोष्टी सोपी नक्कीच नाही. पण, लहानपणापासूनच हुशार होती. तिला अभ्यासाची आवड आहे बीडच्या कु.गौरी दिलीप जवंजाळ हिने ते शक्य करून दाखवलं असुन कोणत्याही परिस्थितीत यशस्वीरीत्या होईपर्यंत जिद्दीला पेटलेल्या गौरीची इच्छा अखेर पूर्ण झाली आहे तिने प्रतिकूल परिस्थिती मात करत दहावीच्या परीक्षेत तब्बल ७८.०० टक्के म ार्क्स मिळवलेत. तिच्या यशाकडे पाहून आई-वडिलांच्या डोळ्यात आनंदाश्रू वाहू लागले आहे. या यशस्वी वाटचालीबद्दल सर्वत्र कौतुक होताना पाहायला मिळाले.



कु. सृष्टी मोहिनी सुधाकर देशमुख हिने 10 वी शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९६. ४० टक्के गुण मिळवून उत्तुंग यश प्राप्त केल्याबद्दल वृक्षमित्र शुभेच्छा देताना.



बीड शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांची मुलगी कु.वैष्णवी परमेश्वर सातपुते दहावी बोर्ड परिक्षामध्ये ९३.२० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाल्याने चंपावती विद्यालय बीड येथील मुख्याध्यापक व सर्व शिक्षक व दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे यांनी अभिनंदन केले.

## पठाण सलमान खान रईस खानचे ८७ टक्के घेवून उत्तीर्ण



**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल (डीपीएस) चा विद्यार्थी आणि प्रसिद्ध विधीज्ञ अॅड.रईस पठाण यांचा मुलगा पठाण सलम ान खान याने ८७ टक्के गुण घेवून घवघवीत यश संपादन केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये पठाण सलमान खान याने इयत्ता १० वी परिक्षा सीबीएसई बोर्डच्या माध्यमातून दिली. यामध्ये त्याने इंग्रजी, मराठी, मॅथेमॅटिक्स, सायन्स, सोशन सायन्स आणि इन्फॉमेशन टेक्नॉलॉजी या सर्वच विषयात विशेष प्राविण्यासह गुण घेवून ए प्लस श्रेणी मिळविली आहे. या यशाबद्दल त्याचे आई-वडील, नातेवाईक, स्कूलचे संचालक, मुख्याध्यापक यांसह सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

## दहावीच्या परीक्षेत जुनैरा अंबर व अलिना फातेमा चे यश



**बीड । प्रतिनिधी**

दहावी च्या बोर्ड परीक्षेचा निकाल मंगळवार (दि.१३) रोजी जाहीर झाला. या परीक्षेत बीड येथील जुनैरा अंबर ९० तर अलिना मतीन शेख हिने ८५ टक्के गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

विद्यार्थी दशेतील महत्वाचा टप्पा मानल्या जाणाऱ्या दहावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवार (दि.१३) रोजी दुपारी १ वाजता जाहीर झाला. जुनैरा अंबर ही महाराष्ट्र राज्य जीवनोत्ती विभागाचे बीड जिल्हा व्यवस्थापक शेख शकील यांची कन्या आहे तर अलिना फतेमा ही त्यांची भाची आहे.

# सावित्रीबाई माध्यमिक विद्यालयाची यशाची परंपरा कायम

### कु.पूनम शिंपाळे प्रथम तर शुभांगी चव्हाण, पूजा बगडे द्वितीय

**देगलुर । प्रतिनिधी**

शहरातील नामांकित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय देगलूर, या विद्यालयाचा निकाल दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी उल्लेखनीय लागल्याने दहावीच्या परीक्षेत पुन्हा सावित्रीबाई फुले विद्यालयाने यशाची परंपरा कायम ठेवली. सदरिल विद्यालयात सेमी व मराठी असे दोन वर्ग चालतात शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मध्ये दोन्ही वर्गातुन एकूण ११० विद्यार्थी परिक्षेस बसलेले होते. त्यापैकी १०० विद्यार्थी उत्तीर्ण झाले.कु. पूनम शिंपाळे (८९%), कु. शुभांगी चव्हाण (८८. २०%), कु. पूजा बगडे (८८.२०%) यांच्यासह शाळेतील सेमी तुकडीचा निकाल हा १००% असून, विशेष प्राविण्य मिळवणारे १५ विद्यार्थी तर प्रथम श्रेणीतील ३६ आणि व्दितीय श्रेणीमध्ये ३४ विद्यार्थी व पास विद्यार्थी १४ यशस्वी झाले असून शाळेचा निकाल हा ९०.९०% लागला आहे.या यशाबद्दल लोकहित शिक्षण संस्थेचे,अध्यक्ष श्री राजाराम कहाळेकर ,संस्थेचे सचिव अॅड. जयवंत गजभारे , माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री यशवंत गजभारे , प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री किशन पाटील तसेच शाळेतील सर्व शिक्षक,शिक्षिका व शिक्षेकेत्तर कर्मचाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे तसेच दहावीच्या श्री. सोमूरे व्हि. एस व श्री चिद्रावार ए. ए तसेच परीक्षा प्रमुख विशाल पवार यांच्या सह दोन्ही वर्गाचे वर्ग शिक्षक तसेच सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले त्याबद्दल संस्थेकडून अभिनंदन करण्यात आले.



कु. शिंपाळे पूनम (89%) कु. शुभांगी चव्हाण (88.20%) कु.पुजा बगडे (88.20%)

